# मुंबई विद्यापीठ

क्र. आरइजी/आयसीसी/२०२४-२५/०६

**परिपत्रक :-**

महोदय / महोदया

मुंबई विद्यापीठाच्या वसतिगृह प्रवेशाबाबत मुंबई विद्यापीठाच्या विविध पदवी / पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील **विभाग प्रमुखांना** सुचित करण्यात येते की,

१. वसतिगृह प्रवेशाकरिता आपल्या विभागासाठी निश्चित केलेल्या जागांनुसार विद्यार्थी / विद्यार्थीनीची वसतिगृह प्रवेशासाठी निवड करून त्यांची नावे विभाग प्रमुखांनी संबंधीत विभागाच्या लेटर हेड वर लिहुन सही, स्वाक्षरी व शिक्या सह संबंधीत हॉस्टेल वार्डनच्या ईमेल वर पाठवावेत व त्याची प्रत मध्यवर्ती वसतीगृह सल्लागार समितीच्या ईमेल वर पाठवावी.

२. विद्यार्थी वसतिगृह प्रवेशाबाबत प्रवेश प्रक्रिया पुर्ण होण्यासाठी कमीत कमी वेळेत विद्यार्थ्यांची नावे निवड करून नावे पाठवावीत व वसतिगृह प्रवेश प्रक्रिया ३१ जुलै २०२४ पर्यंत पुर्ण कराव्यात.

३. प्रवेशप्रक्रिया पुर्ण होण्यास विलंब झाल्यास व विद्यार्थ्यांच्या नावाची शिफारस करण्यास विलंब झाल्यास त्याबाबत माहिती व विद्यार्थ्यांची नावे पाठविण्यास लागणाऱ्या अपेक्षीत कालावधीची माहिती दि. ३१ जुलै २०२४ पर्यंत संबंधीत वसतिगृहाच्या वॉर्डनच्या ईमेल वर पाठवावे व त्याची प्रत मध्यवर्ती वसतीगृह सल्लागार समितीच्या ईमेल वर पाठवावे.

४. विद्यार्थी / विद्यार्थीनीची वसतिगृहात राहण्याकरिता शिफारस करताना त्यांचे पदवी / पदव्युत्तर इ. परिक्षेतील गुण, त्यांचे मुळ गाव / राहण्याचे ठिकाण, आर्थिक परिस्थिती, आरक्षण विषयक शासकिय धोरण/ मार्गदर्शक तत्वे वसतिगृहाच सामान्य नियमावली इत्यादी निकषांच्या आधारे निवड करावी.

पुढे .....२

५. विभागप्रमुखांनी वसतिगृह प्रवेशासाठी निवड केलेल्या विद्यार्थ्यांच्या यादी बरोबरच विद्यार्थ्यांची निकड लक्षात घेउन दोन विद्यार्थ्यांच्या नावाची शिफारस प्रतिक्षायादी करीता पाठवावी.

६. दि. ३१ जुलै २०२४ नंतर वसतिगृहात विविध विभागांच्या कोटयानुसार न भरलेल्या (Unfilled/Unclaimed) व रिक्त राहिलेल्या जागांवर विविध विभागांच्या विद्यार्थ्यांच्या प्रतिक्षायादी नुसार त्यांची निवड मध्यवर्ती वसतीगृह सल्लागार समितीद्वारे करण्यात येईल. रिक्त असलेल्या (Unfilled/Unclaimed) जागांवर ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश दिला जाईल तो एक वर्ष कालावधीकरिता राहिल व एक वर्षानंतर मुळ विभागाच्या विद्यार्थ्यांची वसतिगृहासाठी मागणी आल्यास संबंधीत विद्यार्थ्यास वसतिगृह सुविधा पुढील वर्षासाठी उपलब्ध राहणार नाही. सदर बाब मान्य असल्याचे हमीपत्र संबंधीत विद्यार्थ्याने विभागप्रमुखामार्फत वसतिगृह अधिक्षक यांचेकडे जमा करणे आवश्यक आहे.

७. वसतिगृह प्रवेशाबाबत केंद्रिय वसतिगृह सल्लागार समितीचा निर्णय अंतिम असेल आणि तो संबंधित विभाग प्रमुखांना कळविला जाईल. विभाग प्रमुखांनी सदर यादी संबंधीत विभागाच्या सुचना फलकावर लावावी व संबंधीत विद्यार्थ्यांला याबाबत माहिती द्यावी.

८. वसतिगृह प्रवेशाची प्रक्रिया खालील प्रमाणे राहिल याबाबत विभाग प्रमुखांनी विद्यार्थ्याला मार्गदर्शन करावे.

विद्यार्थ्यांनी ई–समर्थ पोर्टलवर वसतिगृह प्रवेश प्रक्रियेसाठी स्वत:ची नोंदणी करावी. विद्यार्थ्यांनी संबंधित अभ्यासक्रमाची फी ऑनलाईन प्रस्तुत केल्यानंतर आणि प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या समर्थ लॉगिनवर वसतिगृह नोंदणीसाठी लिंक मिळेल. ही लिंक दिनांक १ जुलै २०२४ ते ३१ जुलै २०२४ पर्यंत सक्रिय असेल. विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेल्या दिवसापासून १० दिवसांच्या आत वसतिगृह प्रवेशासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी.

वसतिगृह प्रवेशासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी संबंधित वसतिगृहात व संबंधित विभागाच्या सूचना फलकावर पाहता येईल. विद्यार्थ्यांने वसतिगृह प्रवेश नोंदणी करताना ई समर्थ पोर्टलवर दिलेल्या सूचनांचे पालन करावे आणि त्यांनी पोर्टलवर वसतिगृह शुल्क भरल्याची पावती इ. आवश्यक कागदपत्र वसतिगृहातील वॉर्डन यांच्या कार्यालयात द्यावेत.

पुढे ....३

वसतिगृहाच्या ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्या संबंधीची माहिती/टप्पे.

1. Go to the website -> mu.samarth.edu.in
2. Login using your enrolment number and password
3. Go to Services
4. Click on the Hostel Tab to Apply
5. Then Click on Hostel Accommodation
6. Then Click Apply
7. Then fill the details (Those who are already staying in the hostel, click your hostel as the 1st preference)
8. Don't upload any document
9. Click on Submit

After allotment only you will have to pay the fees online.
(No Offline Payment will be accepted)

वसतिगृह प्रवेशाकरीता विभाग प्रमुखांनी विद्यार्थीनी/विद्यार्थ्यांच्या नावाची शिफारस संबंधीत वसतिगृहाच्या ई—मेल द्वारे अधिक्षक यांच्या कडे देण्यात यावी व प्रत मध्यवर्ती वसतीगृह सल्लागार समिती च्या ई—मेल वर पाठवण्यात यावी.

| अ. क्र. | वसतिगृहाचे नाव | ई—मेल आय.डी |
|---|---|---|
| १ | जे.एस.हॉल हॉस्टेल, चर्चगेट | jshallhostel1958@gmail.com |
| २ | मादाम कामा गर्ल्स हॉस्टेल, चर्चगेट | camahostel@mu.ac.in |
| ३ | न्यु गर्ल्स हॉस्टेल, कलिना, सांताक्रुझ | newgirlshostel@mu.ac.in |
| ४ | सावित्रीबाई फुले गर्ल्स हॉस्टेल, कलिना, सांताक्रुझ | savitribaiphuleladieshostel@gmail.com |
| ५ | महर्षी धोंडो कर्वे गर्ल्स हॉस्टेल, कलिना, सांताक्रुझ | karve.hostel@mu.ac.in |
| ६ | पं. रमाबाई गर्ल्स हॉस्टेल, कलिना, सांताक्रुझ | ramabaihostel@gmail.com |
| ७ | कर्मवीर भाऊराव पाटील मुलांचे वसतिगृह, कलिना, सांताक्रुझ | kbphostel@gmail.com |

**मध्यवर्ती वसतीगृह सल्लागार समितीचा ई—मेल** : hostel.chacommittee@mu.ac.in

Baliram

(प्रा.(डॉ.) बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

दिनांक : १५ जुलै, २०२४
ठिकाण : मुंबई – ४०० ०३२.

प्रति,

मुंबई विद्यापीठाच्या सर्व वसतिगृहांचे अधीक्षक / अधीक्षिका

प्रत माहितीकरिता

१. स्वीय सहाय्यक (अ) कुलगुरू मुंबई विद्यापीठ, मुंबई – ४०० ०३२
(ब) प्र-कुलगुरू मुंबई विद्यापीठ, मुंबई – ४०० ०३२